## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

*(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील**

**क्र.रामाआ/नाशिक/द्वितीय अपील क्रमांक ६२०६/२०२२/धुळे**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. कांतीलाल चुनीलाल जैन, रा. उस गल्ली, फॉरेस्ट ऑफिस शेजारी, धुळे, ता. जि. धुळे. | सहायक मुल्य निर्धारण व कर संकलन अधिकारी, धुळे महानगरपालिका, धुळे, नवीन प्रशासकीय इमारत, गुरुशिष्य स्मारक, साक्री रोड, धुळे, ता.जि.धुळे-४२४००१. | मुल्यनिर्धारक व कर संकलन अधिकारी, धुळे महानगरपालिका, धुळे, नवीन प्रशासकीय इमारत, गुरुशिष्य स्मारक, साक्री रोड, धुळे,ता.जि.धुळे-४२४००१. |

**द्वितीय अपिल सुनावणी दिनांक – १०/०३/२०२५**

| मुळ अर्ज दिनांक | मुळ अर्ज जमाअ यांना प्राप्त दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दिनांक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| ०७/०४/२०२२ | ११/०४/२०२२ | १०/०५/२०२२ | १३/०६/२०२२ | १३/०६/२०२२ | १३/१२/२०२२ |

अपिलार्थी यांनी दि. ०९/१०/२०२२ रोजीच्या अर्जान्वये "जन माहिती अधिकारी यांनी चुकीची माहिती दिली व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कोणतेही आदेश दिले नाही किंवा सुनावणी घेतली नाही." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपील अर्जाद्वारे कोणतीही विनंती केलेली नाही.

२. सदर द्वितीय अपिलाच्या सुनावणीस विद्यमान जन माहिती अधिकारी वगळता सर्व पक्षकार अनुपस्थित आहेत.

३. अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

१. उमाबाई चुनीलाल जैन यांच्या नावे नविन मालमत्ता क्र:W1ZAB२०००३४० जूना मालमत्ता क्र: डी३/२९९७/३ ची म.न.पा-धुळे कर निर्धारणविभाग कडे मालमत्ताधारकाने नोंदणी केल्या पासुनची आजपर्यंतची संपूर्ण तपशील मिळावी.

अ) नोंदणी केलेल्याची दि व वर्षे.

ब) नोंदणी खरीदी अथवा वारसा हक्काने झाली असल्यास त्याचा संपूर्ण तपशील व फेरफार सह माहिती देण्यात यावी.

४. तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये "सदरचे उत्तर बेजबाबदार पणाचे असून मला अमान्य आहे." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

५. सुनावणीवेळी उपस्थित विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचे दि. ०७/०३/२०२५ रोजीचे लेखी निवेदन सादर केले असून त्यामध्ये अपिलार्थीने असे नमुद केले आहे की, प्रथम अपील सुनावणी दि. १५/११/२०२२ रोजीच्या आदेशानुसार, माझ्या शंकाचे समाधान संबंधित विभागाने करुन दिल्यामुळे माझी काही एक तक्रार राहिलेली नाही, म्हणून माझे द्वितीय अपिल निकाली काढण्यात यावे.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक ६२०६/२०२२/धुळे निकाली काढण्यात येत आहेत.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

जावक क्र. 2803

15 APR 2025